महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

WWW.DAILYAWAZ.COM

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे




RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - १२ वे ■ अंक क्र. - २८० ■ सोमवार, दि. १ जून २०२६ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

# सटाण्यात खळबळ! जुन्या अमरधाममध्ये पौर्णिमेच्या मध्यरात्री अघोरी पूजा; अर्धनग्न मांत्रिकासह आलीशान गाड्यांमधून आलेले संशयित पसार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

तुषार रौंदळ सटाणा प्रतिनिधी : : येथील जुन्या अमरधाम (स्मशानभूमी) परिसरात दि. ३० मे रोजी पौर्णिमेच्या मध्यरात्री काही अज्ञात व्यक्तींनी भगवे वस्त्र धारण केलेल्या अर्धनग्न मांत्रिकाला सोबत आणून अघोरी पूजा केल्याचा धक्कादायक आणि संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. पुरोगामी महाराष्ट्राला काळीमा फासणाऱ्या या अंधश्रद्धेच्या प्रकारामुळे सटाणा शहरासह संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, या प्रकरणाचा निषेध केला जात आहे. सविस्तर वृत्त असे की, पौर्णिमेच्या मध्यरात्री सुमारास काही संशयित व्यक्ती आलीशान गाड्यांमधून जुन्या अमरधाम परिसरात आल्या. त्यांच्यासोबत एक अर्धनग्न मांत्रिकही होता. या टोळीने स्मशानभूमीत ज्या ठिकाणी प्रेत जाळले जाते, त्या चितेच्या जागेवर जाऊन अघोरी पूजेला सुरुवात केली. या पूजेसाठी त्यांनी अंडे, लिंबू, उडीद, पुष्प, कवड्या, कापूर नारळ, आणि इतर अनेक तांत्रिक साहित्याचा वापर केला. मध्यरात्रीच्या सुमारास ही पूजा-अर्चा आटोपल्यानंतर, हे सर्व साहित्य त्यांनी त्याच ठिकाणी सोडून दिले. धक्कादायक बाब म्हणजे, पूजेच्या ठिकाणाहून त्यांनी काहीतरी संशयास्पद वस्तू किंवा घटक उचलून आपल्यासोबत नेल्याचे प्रत्यक्षदर्शी आणि मिळालेल्या पुराव्यांवरून समोर आले आहे. या गाड्या तेथून संशयास्पद निघून




जात असताना परिसरातील रहिवासी, रिपब्लिकन सेनेचे प्रवक्ता प्रा. अमोल बच्छाव यांनी व त्यांच्या मित्रांनी पाहिल्या, काहीतरी वेगळा संशय आल्यामुळे त्यांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी केली असता हा प्रकार त्यांनी उघडकीस आणला. या लाजीरवाण्या प्रकाराची माहिती मिळताच रिपब्लिकन सेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. रिपब्लिकन सेनेचे उत्तर महाराष्ट्र प्रवक्ते प्रा. अमोल बाळासाहेब बच्छाव यांनी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे. पुरोगामी विचारांच्या महाराष्ट्रात, विज्ञानयुगातही अशा प्रकारे अंधश्रद्धेतून अघोरी कृत्ये केली जाणे अत्यंत दुर्दैवी आणि लाजीरवाणे आहे. सटाणासारख्या सुजाण शहरात असा प्रकार घडणे सहन केले जाणार नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया प्रा. बच्छाव यांनी दिली. या प्रकरणाचा पोलिसांनी सखोल आणि योग्य तपास करावा, तसेच अमरधाममधील सीसीटीव्ही फुटेज व इतर तांत्रिक बाबी तपासून संशयितांचा शोध घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. संबंधित दोषींवर 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध व त्याचे समूळ उच्चाटन अधिनियम' (जादूटोणा विरोधी कायदा) अन्वये तातडीने गुन्हे दाखल करून कडक कारवाई करावी, अशी आग्रही भूमिका त्यांनी जाहीर केली. यावेळी प्रा. अमोल बच्छाव यांच्यासोबत दत्ता पवार, आबा पाकळे, खुशाल भोसले, प्रथमेश पाटोळे, अजय बच्छाव आदी कार्यकर्ते उपस्थित होते. या अघोरी कृत्यामागचा मुख्य सूत्रधार कोण आहे आणि रात्रीच्या अंधारात स्मशानभूमीतून काय नेण्यात आले, याचा छडा लावण्याचे मोठे आव्हान आता पोलिसांसमोर आहे.

## विश्रांतवाडी परिसरात २० दिवसांपासून दूषित पाणीपुरवठा; नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**दै. आवाज वृत्तसेवा...**

पुणे: विश्रांतवाडी येथील वडार वस्ती क्रमांक ११२, भीमनगर, शांतीबन सोसायटी व परिसरात गेल्या सुमारे २० दिवसांपासून अस्वच्छ व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून अनेकांना जुलाब, उलट्या, पोट मीदुखी यांसारख्या आजारांचा त्रास होत असल्याची माहिती स्थानिक रहिवाशांनी दिली आहे.या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी पुणे पँथर सेनेचे संस्थापक अध्यक्ष सचिन भोसले यांनी पुणे महानगरपालिकेकडे ऑनलाइन तक्रार नोंदवून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. याबाबत बोलताना सचिन भोसले म्हणाले, परिसरातील नागरिकांना सुरक्षित व शुद्ध पिण्याचे पाणी मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. गेल्या अनेक दिवसांपासून दूषित पाणीपुरवठा होत असून त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे. प्रशासनाने तातडीने पाणीपुरवठ्याची तपासणी करून स्वच्छ पाणी उपलब्ध करून द्यावे.तसेच, दूषित पाणीपुरवठा तात्काळ बंद करून लवकरात लवकर स्वच्छ पाणीपुरवठा सुरू न केल्यास पुणे पँथर सेनेच्या वतीने आणि परिसरातील नागरिकांच्या सहभागातून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सचिन भोस-



ले व स्थानिक नागरिकांनी दिला आहे. दरम्यान, नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सचिन भोसले यांनी आवाहन केले आहे की, जोपर्यंत पाणी पूर्णपणे स्वच्छ येत नाही, तोपर्यंत नागरिकांनी पाणी गाळून व उकळूनच पिण्यासाठी वापरावे.विश्रांतवाडी परिसरातील नळातून येणारे पिवळसर व दूषित पाणी.

## आरक्षण उपवर्गीकरणाची तात्काळ अंमलबजावणी करा; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

**दै. आवाज वृत्तसेवा...**



पुणे : अनुसूचित जातींमधील ५९ घटकांना न्याय्य पद्धतीने आरक्षणाचा लाभ मिळावा यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी पुणे शहर जिल्हा मातंग समाजाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आली. तसेच कोणत्याही समाजातील महापुरुषांविषयी अपमानास्पद वक्तव्य करणाऱ्यांवर प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

या पत्रकार परिषदेला माजी मंत्री दिलीप कांबळे, सुभाष जगताप, आमदार अमित गोरखे, अविनाश बागवे, विष्णू कसबे, शंकर तडाखे, पुणे शहर जिल्हा मातंग समाजाचे सचिव दीपक कसबे यांच्यासह समाजाच्या कोअर कमिटीचे सदस्य विकास सातारकर, भास्कर नेटके, डॉ. संपत जाधव, सुनील खंडागळे, सचिन जोगदंड, शंकर शेंडगे, ॲड. महेश सकट, संजय केंजळे, दयानंद आढागळे, लक्ष्मण तांदळे आणि समाजातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार अमित गोरखे यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यास मान्यता दिली असून त्यामुळे आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत अधिक समतोल आणि न्याय्य पद्धतीने पोहोचू शकतो. मात्र, शासनाकडून अद्याप या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याने समाजामध्ये नाराजी वाढत आहे. त्यामुळे शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेणे

(पान २ वर)

## विद्युत तारेला धडकून मोराचा मृत्यू (चाफळ विभागातील घटना)

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कराड , चाफळ विभागातील नाणेगाव परिसरात राष्ट्रीय पक्षी असलेल्या मोराचा विद्युत तारेला धडकून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरातील ग्रामस्थ व निसर्गप्रेमींमध्ये हळहळ व्यक्त होत असून वनविभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा प्रक्रिया सुरू केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, चाफळ-पाडळोशी मार्गालगत नाणेगाव येथील न्यू इंग्लिश मिडीयम स्कूल शेजारील शेतामध्ये शुक्रवारी सकाळच्या सुमारास काही शेतकऱ्यांना एक मोर मृतावस्थेत पडलेला दिसून आला. शेतात कामासाठी गेलेल्या नागरिकांनी जवळ जाऊन पाहणी केली असता मोराचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. यानंतर संबंधित घटनेची माहिती तात्काळ वनविभागाला देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच वनपाल लालासो मोहिते, वनरक्षक गजानन समरस तसेच वनमजूर जगन्नाथ चव्हाण यांनी त्वरित घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी परिसराची पाहणी करून प्राथमिक तपास केला असता शेतातून गेलेल्या विद्युत तारेला धडक लागल्याने मोराचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले. विद्युत वाहिन्या कमी उंचीवर असल्याने वन्य पक्षी व प्राण्यांच्या जीवाला धोका निर्माण होत असल्याची चर्चा यावेळी ग्रामस्थांमध्ये सुरू होती. मृत मोराचा पंचनामा करण्यासाठी चाफळ येथील पशुवैद्यकीय अधिकारी दवाखान्यात उपलब्ध नसल्याने संबंधित मोराला पुढील शवविच्छेदनासाठी मल्हारपेठ येथे पाठविण्यात आले. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे वनविभागाकडून सांगण्यात आले. दरम्यान, नाणेगाव परिसरात मोरांची संख्या चांगली असून अनेकदा हे मोर शेत परिसरात मुक्त संचार करताना दिसून येतात. मात्र विद्युत तारा, रासायनिक फवारणी तसेच अधिवास कमी होणे यामुळे वन्यजीवांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. संबंधित विभागाने धोकादायक ठिकाणच्या विद्युत तारा सुरक्षित कराव्यात तसेच वन्यजीव संरक्षणासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

****



# पुणे, पिंपरी चिंचवड शहरात विषारी दारु पिल्याने अनेकांचा मृत्यू, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे निषेध आंदोलन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

पिंपरी चिंचवडः पिंपरी चिंचवड शहर आणि पुणे शहरात विषारी मद्य प्राशन केल्यामुळे अनेकांचा मृत्यू झाला आहे. यामुळे शहरात एकाच वेळी दुःखाची आणि संतापाची लाट उसळली आहे. या घटनेनंतर पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील सत्ताधारी भाजप पक्ष सत्ताधारी आमदार आणि पोलीस प्रशासन यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह तयार झाले आहेत. या सगळ्या च्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या पिंपरी चिंचवड शहर शाखेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काल दापोडी येथे निषेध आंदोलन केले. या आंदोलनाला मोठ्या प्रमाणात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. तसेच यासंदर्भात पिंपरी चिंचवड अप्पर पोलीस आयुक्त सारंग आवाड साहेब यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या पिंपरी चिंचवड शहरातील पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली. पोलीस प्रशासनाचा गलथान कारभार त्यांच्या निर्दशनास आणून दिला. या प्रकरणाशी संबंधित सर्वांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी बोलताना विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे म्हणाले की, अशा प्रकारच्या घटना घडणे हे पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात प्रशासनाचे नियंत्रण राहिलेले नाही. भारतीय जनता पक्षाचे स्थानिक आमदार आणि नेतेमंडळी यांच्याकडून अशा प्रकारच्या अवैध धंद्यांना अभय मिळत आहे की काय अशी शंका निर्माण होते. त्यांच्याकडूनच स्थानिक प्रशासनावर दबाव आणून हे सगळे राजरोसपणे सुरू ठेवले जात आहे अशी शंका घ्यायला जागा आहे. गेल्या काही महिन्यांपासून पुणे, पिंपरी चिंचवड आणि इतर महाराष्ट्रात ज्या प्रकारे चुकीच्या घटना घडत आहेत त्याकडे पाहता राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे पूर्णतः अपयशी ठरले आहेत. त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे. यावेळी युवक शहराध्यक्ष इमरान शेख म्हणाले की, आजची घटना घडलेली दुर्दैवी असून अशा घटना पूर्वी बिहार किंवा उत्तर प्रदेश यासारख्या ठिकाणी आपल्याला



ऐकायला पाहायला मिळायच्या. भाजपच्या या सरकारने आणि प्रामुख्याने गृहमंत्री फडणवीस यांच्या नाकर्तेपणाचा कळस असा झाला आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पुणे आणि पिंपरी चिंचवड शहराची अवस्था आज बिहार सारख्या बिमारु राज्यासारखी झाली आहे. यावेळी कार्याध्यक्ष देवेंद्र तायडे म्हणाले की, सर्वासामान्य जनता महागाई मध्ये होरपळली जात आहे. अशावेळी कुटुंबप्रमुख हा विषारी दारू मुळे मृत्युमुखी पडत असेल तर संपूर्ण कुटुंब उध्वस्त होते . शासनाच्या दुर्लक्षामुळेच अशा घटना घडत असतात याला संपूर्णतः शासन जबाबदार आहे. सरकारने मृत पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना मदत केली पाहिजे. यावेळी महिला शहराध्यक्ष ज्योती निंबाळकर म्हणाल्या की, आज पिंपरी चिंचवड शहर स्मार्ट सिटी म्हणून त्याची ओळख आहे आणि या स्मार्ट सिटीला गालबोट लागावे अशी निंदनीय घटना शहरात केवळ प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे घडलेली आहे. दारूच्या आहारी गेलेल्या तरुणांमुळे कुटुंबाला अनेक संकटांना सामोरे जावे लागते. अशातच कर्त्या पुरुषांचा विषारी दारू पिण्यामुळे मृत्यू झाल्यावर परिवारावर खूप मोठे संकट उभे राहिले आहे. याला प्रशासन जबाबदार आहे. यावेळी सामाजिक न्याय शहराध्यक्ष मयुर जाधव म्हणाले की, स्थानिक पोलीस आणि एक्साईज (उत्पादन शुल्क) विभागाच्या डोळ्यादेखत हे अवैध अड्डे चालत होते. त्यामुळे केवळ हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांचे निलंबन नको, तर त्यांची कडक चौकशी व्हावी. मृत व्यक्ती हे घरातील कमावते कष्टकरी होते. सरकारने या गरीब कुटुंबांना तातडीने भरीव आर्थिक मदत जाहीर करावी. आमचा प्रशासनाला थेट इशारा आहे-केवळ दुर्घटना घडल्यावर दोन दिवस कारवाईचे नाटक करू नका. पिंपरी-चिंचवड आणि पुण्यातील प्रत्येक अवैध दारूचा अड्डा कायमचा उद्धस्त झाला पाहिजे, नाहीतर आम्ही जनतेला सोबत घेऊन रस्त्यावर उतरू. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, युवक शहराध्यक्ष इमरान शेख, महिला शहराध्यक्ष ज्योती निंबाळकर, कार्याध्यक्ष देवेंद्र तायडे, वरिष्ठ उपाध्यक्ष काशिनाथ जगताप, सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष मयूर जाधव, कल्पनाताई घाडगे, युवक विधानसभा अध्यक्ष ड. संतोष शिंदे सरचिटणीस रजनीकांत गायकवाड, वसीम पठाण, विद्यार्थी विधानसभा अध्यक्ष रिषभ भाडाळे, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आप्पा गायकवाड, नाभिक समाज महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजू वाळुंजकर, दीपक साळवी, बबलू चखाले, सामाजिक कार्यकर्ते, मेहबूब शेख काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते भाऊसाहेब मुकुटमल, सुहास देशमुख व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## इंदापूर तालुक्यातील निमसाखर गावामध्ये श्री स्वामी समर्थ महाराजांची पौर्णिमा साजरी




**दै. आवाज वृत्तसेवा...**

इंदापूर प्रतिनिधी गणेश धनवडे निमसाखर मध्ये श्री स्वामी समर्थ महाराजांची पौर्णिमा अति उत्साहात साजरी करण्यात आली. या पौर्णिमेनिमित्त दत्त मंदिरामधून स्वामी समर्थांच्या पालखीची ग्राम प्रदक्षिणा काढण्यात आली. पालखीचे चौका चौकात रांगोळी काढून महिलांनी स्वागत केले.पालखी मंदिरात आल्यानंतर ह.भ. प. श्री निवृत्ती उद्धव महाराज मरडे पंढरपूर यांचे स्वामी समर्थांच्या जीवनावर प्रवचन झाले त्यानंतर श्री स्वामी समर्थ महाराजांची आरती व जप घेण्यात आला सर्व जमलेल्या स्वामी भक्तांना श्री संतोष पांडुरंग माने घोरपडवाडी यांच्यातर्फे महाप्रसाद देण्यात आला. तसेच पालखीची सजावट श्री राजेंद्र मारुती घोडे यांनी केली होती तसेच वालचंद नगरचे स्वामीभक्त श्री राम कुंभार यांच्यातर्फे दत्त मंदिरामध्ये मनमोहक अशी रांगोळीची सेवा करण्यात आली. या कार्यक्रमाला निमसाखर गावांमधील सर्व स्वामी भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते

## एसएनडी. टी-२० चॅम्पियनशिपमध्ये विक्रमगडचा रियल अकॅडमीला विजेतेपद

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : बाभुळगाव (धानोरे) येथे एस. एन. डी. सीबीएसई स्कूल क्रिकेट अकॅडमी आयोजित करण्यात आलेल्या एस. एन. डी. टी-२० चॅम्पियनशिप स्पर्धेत रियल टॅलेंट क्रिकेट अकॅडमी, विक्रमगड संघाने उत्कृष्ट आणि सर्वांगीण खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत रियल अकॅडमी विक्रमगड, साई कृपा अकॅडमी अहिल्यानगर, सुदर्शन क्रिकेट अकॅडमी कोपरगाव आणि एस. एन. डी. क्रिकेट अकॅडमी, येवला या संघांचा समावेश होता.स्पर्धा रंगतदार आणि चुरशीची झाली असून प्रत्येक सामन्यात खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रेक्षकांचे मनोरंजन केले.रियल टॅलेंट क्रिकेट अकॅडमी, विक्रमगड संघाने स्पर्धे दरम्यान सलग तीन सामने जिंकत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली.अंतिम सामन्यातही त्यांनी जबरदस्त खेळ करत प्रतिस्पर्धी



संघावर मात केली आणि विजेतेपदावर आपले नाव कोरले. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही विभागांमध्ये संघाने संतुलित व प्रभावी कामगिरी करत आपली ताकद दाखवून दिली. संघाचा कर्णधार वैभव हिलम याने संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट नेतृत्व करत संघाला विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली. त्याच्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी खेळाच्या जोरावर त्याला मॅन ऑफ द सिरीज हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.स्पर्धेचे आयोजन एस. एन. डी. सीबीएसई स्कूल क्रिकेट अकॅडमी, धानोरे यांच्या वतीने करण्यात आले होते.

## नॅशनल हार्टीकल्स रिसर्च डेव्हलपमेंट फाउंडेशन चितेगाव यांच्या तर्फे दिलीप बर्वे यांचा सत्कार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नॅशनल हार्टीकल्स रिसर्च डेव्हलपमेंट फाउंडेशन चितेगाव ता.निफाड जि.नाशिक या संस्थेच्या माध्यमातून नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ५ दिवशीय शेतकरी शेतीविषयक प्रशिक्षण कार्यशाळेसाठी प्रयत्नशील राहुन शेतकरी शेतीविषयक प्रशिक्षण कार्यशाळेचा कार्य उत्तमरीत्या सामाजिक कार्य यशस्वी केल्याबद्दल संस्थेचे केंद्र प्रमुख श्री.डॉ.सुजय पांडे तसेच जैविक किटकनाशके तज्ञ डॉ.श्री.आर.सी. गुप्ता तसेच संस्थेचे अधिकारी कर्मचारी



शेतकरी यांचे हस्ते श्री.दिलीप काकाजी बर्वे यांना शाल श्रीफळ सन्मान पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यासाठी त्यांच्या आजूबाजूच्या परिसरातून त्यांचे कौतूक केले जात आहे.

## आरक्षण उपवर्गीकरणाची तात्काळ ...

(पान १ वरून) आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. माजी मंत्री दिलीप कांबळे यांनी आपल्या भाषणात समाजातील महापुरुषांचा अवमान करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. अशा घटनांमुळे सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता असून प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, आरक्षण उपवर्गीकरणाच्या अंमलबजावणीबाबत शासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय न घेतल्यास पुणे शहर जिल्हा मातंग समाजाच्या वतीने राज्यव्यापी आणि तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# एमव्हीपीएमच्या किर्तिश्री काबरा विद्यालयाचे सोलापूरात औपचारिक उद्घाटन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक, २९ मे २०२६: सोलापूरमध्ये अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा विकसित करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकत लक्ष्मीनारायण मंदिर शैक्षणिक संकुलात एमव्हीपीएमच्या किर्तिश्री काबरा विद्यालयाचे (सीबीएसई शाळा) अधिकृतपणे उद्घाटन करण्यात आले. जून २०२६ पासून शाळेची सुरुवात नर्सरी ते इयत्ता ७ वी पर्यंत करण्यात येत असून टप्प्याटप्प्याने इयत्ता १२ वी पर्यंत विस्तार करण्याची योजना संस्थेकडून आखण्यात आली आहे.

या भव्य उद्घाटन सोहळ्याला प्रसिद्ध आर्थिक तज्ज्ञ आणि परोपकारी श्री. आनंद राठी यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती, ज्यांनी या विद्यालयाचे रीतसर उद्घाटन केले. हा कार्यक्रम किर्तिश्री काबरा फाउंडेशनचे मुख्य दाते आणि विश्वस्त श्री. श्रीगोपाल काबरा आणि श्रीमती किर्ति काबरा यांच्या आदरणीय उपस्थितीत पार पडला, ज्यांच्या पाठबळाने हा प्रकल्प प्रत्यक्षात उभारण्यात आला.

या सोहळ्याला माहेश्वरी विद्या प्रचारक मंडल (एमव्हीपीएम)चे अध्यक्ष, विश्वस्त आणि प्रमुख सदस्यांसह स्थानिक आमदार (एमएलए), खासदार (एमपी) आणि इतर प्रमुख कॉर्पोरेट दाते यांसारखे



ज्येष्ठ मान्यवर उपस्थित होते.

एमव्हीपीएमच्या या संकुलात अनेक आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत, ज्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे:

कम्युनिकेशन लॅब (एलएसआरडब्ल्यू स्किल्स, वक्तृत्व कौशल्य)

सायन्स एक्सपिरियन्स सेंटर (विज्ञान अनुभव केंद्र)

स्ट्रीम लॅब (एआय-एमएल, रोबोटिक्स, ड्रोन टेक्नॉलॉजी, एआर/व्हीआर, इत्यादी)

ॲस्ट्रॉनॉमी (खगोलशास्त्र) आणि इस्रो लॅब

पॉडकास्ट रूम (कंटेंट मेकिंग, कम्युनिटी एंगेजमेंट आणि ब्रॉडकास्ट स्टुडिओ)

अत्याधुनिक वर्गखोल्या

स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, एनपीएव्ही क्रीडा मैदान, सभागृह आणि खुल्या छताचे नाट्यगृह (ओपन-एअर ॲम्फीथिएटर)

किर्तिश्री काबरा फाउंडेशनमध्ये आमचा विश्वास आहे की, शिक्षणाची संधी आणि सन्मान हे प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याचा मूलभूत हक्क असावा. किर्तिश्री काबरा विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा, दर्जेदार शिक्षण आणि सर्वांगीण विकासासाठी आवश्यक वातावरण उपलब्ध करून दिले जाईल, ज्यामुळे त्यांना प्रगतीच्या नव्या संधी मिळतील. जवळपास ९७ वर्षांचा समृद्ध वारसा लाभलेल्या एमव्हीपीएम संस्थेच्या सहकार्याने हा प्रकल्प साकारताना आम्हाला अत्यंत अभिमान वाटतो. दर्जेदार शिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या एकूण व्यक्तिमत्त्व विकासासाठी योगदान देण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील,असे श्रीमती किर्ति काबरा म्हणाल्या.

*****

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायक्षेत्र) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# विखरणीला पाणीटंचाईमुळे शेतकऱ्याने दीड एकरातील डाळिंबाचे ४०० झाडे तोडली

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : विहिरी कोरड्या झाल्या..दोन- तीन शेततळेही प्रचंड उन्हामुळे कोरडे झाले.. पाणीच नसल्याने डाळिंबाच्या झाडांनीही कात टाकली...यामुळे डोळ्यादेखत पोटच्या लेकरांसारखी जपलेली दीड एकरातील तब्बल ४०० डाळिंबाची झाडे काही तासांत जमीनदोस्त होताना पाहण्याची वेदनादायक वेळ विखरणी येथील शेतकऱ्यावर आली. पाणीटंचाईच्या भीषण झळांमुळे हतबल झालेल्या या शेतकऱ्याने अखेर स्वतःच कुऱ्हाड हाती घेत कष्टांची उभी बाग संपवली. विखरणी येथील या हृदयद्रावक घटनेने ग्रामीण भागातील भीषण पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांची असहाय्यता अधोरेखित झाली आहे.येथील शेतकरी



बापूसाहेब शेलार यांनी अनेक वर्षांच्या कष्टाने उभी केलेली बाग अक्षरशः काही तासांत जमीनदोस्त केली.मे महिन्यातील कडाक्याचे ऊन, पावसाचा पूर्णतः अभाव आणि वाढते तापमान यामुळे परिसरातील पाण्याचे सर्व स्रोत आटले आहेत. विहिरी, शेततळे कोरडी पडल्याने पिकांसाठीच नव्हे तर पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. या बिकट परिस्थितीत शेती वाचवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले अन घेतलेली बागही जगवीने आता असह्य झाल्याने नाईलाजाने चौथ्याच वर्षी बाग तोडण्याची वेळ आली आहे. १३०० झाडे काही तासांत संपली बापूसाहेब शेलार यांनी तीन वर्षांपूर्वी दीड एकर क्षेत्रात सुमारे ४०० डाळिंबाची झाडे लावून बाग विकसित केली होती.मागील वर्षी या बागेचे उत्पन्नही त्यांनी घेतले,यावर्षी तर डाळिंबाला तेजी असल्याने चांगले उत्पन्न मिळण्याची आशा असतानाच त्यांचा स्वप्नांचा चक्काचूर झाला.बाग टिकवण्यासाठी त्यांनी टँकरने पाणी आणून प्रयत्न केले, मात्र तीव्र उष्णतेसमोर हे प्रयत्न अपुरे ठरले. अखेर बाग वाचवणे अशक्य झाल्याने त्यांनी नाईलाजाने सर्व झाडे तोडण्याचा कठोर निर्णय घेतला. पोटच्या लेकरासारखी जपलेली बाग नष्ट होताना कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले. या घटनेने तालुक्यातील शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती पुन्हा अधोरेखित झाली असून निसर्गाच्या कोपापुढे शेतकरी हातबल होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

> पाणी उपलब्ध असलेल्या पाटोदा भागातून पाईपलाईन,दोन तीन विहिरी, तीन शेततळे एवढे सगळे पर्याय असतानाही वाढत्या उष्णतेमुळे पाणी टिकत नाही. एक शेततळे फक्त बागेसाठी ठेवले होते मात्र तेही पाणी बाष्पीभवनाने आटून गेले.टँकरचे पाणीही पुरले नाही.एकीकडे निसर्ग साथ देत नाही आणि दुसरीकडे शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही.या बागेसाठी शासनाने नुकसान भरपाई ही द्यावी.सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन हमीभाव द्यावा.
> – बापूसाहेब शेलार, प्रगतशील शेतकरी, विखरणी

# संवेदनशीलता जपणारे हजरजबाबी अधिकारी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कराड – साधारणपणे पाच वर्षांपूर्वी म्हणजे शनिवारी २३ जुलै २०२२ रोजी पप्पांचे अल्पशा आजाराने दुर्दैवी निधन झाले. निधनानंतर शासनाच्या पोलीस प्रशासन, महसूल, कृषी, वन, ग्रामविकास, आरोग्य, शिक्षण अशा विविध विभागातील अधिकाऱ्यांनी भेट घेत कुटुंबीयांचे सांत्वन केले. आपल्या उच्चतम कर्तव्य कठोरतेसोबत सहृदय माणुसकी, जिव्हाळा जपणारे संवेदनशील मनाचे अधिकारी समाजात कार्यरत आहेत.

त्यामध्ये प्रामुख्याने उंब्रज महसूल मंडलाचे तत्कालीन मंडलाधिकारी श्री युवराज कृष्णराव काटे यांचा नामोल्लेख या ठिकाणी करावा लागेल. आपल्या व्यस्त जीवनशैलीतून वेळ काढत त्यांनी मला सांत्वनपर भेट देणं महत्त्वाचं मानून दाखवलेला संवेदनशीलपणा आणि एका प्रसंगी दाखवलेला हजरजबाबीपणा माझ्या मनाला खूपच भावला अन् एका कणखर अधिकाऱ्याचे दर्शन देऊन गेला. सोमवारी २५ जुलै रोजी रक्षाविसर्जन पार पडल्यानंतर अंगणामध्ये घातलेल्या मंडपात शून्यात नजर लावून भूतकाळातील आठवणींमध्ये हरवून गेलो असता अचानकपणे उंब्रज मंडलाचे तत्कालीन मंडलाधिकारी युवराज काटे आपले कोतवाल सुभाष चव्हाण यांच्या समवेत सांत्वनपर भेट देण्यासाठी आले.सर्कल साहेबांनी भेटीदरम्यान



वडिलांना झालेला आजार, वेळोवेळी हॉस्पिटलमध्ये करण्यात आलेले उपचार तसेच वडिलांचा संपूर्ण जीवनपट जाणून घेत मला त्या कठीण काळात आवश्यक असलेला मौलिक, मानसिक आधार देण्याचे काम केले. दरम्यान,आमची चर्चा सुरू असताना त्या ठिकाणी उपस्थित असणाऱ्या ग्रामस्थांनी सर्कल साहेबांना चहाचे निमंत्रण देत घरी चला,असा आग्रह केला. परंतु,प्रसंगाचे,वेळेचे गांभीर्य ओळखून प्रसंगावधानाने ज्या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी मी आलो आहे त्या कुटुंबासोबतच मी चहा घेणार असे उद्गार काढत दाखवलेला हजरजबाबीपणा खरोखर प्रशंसनीय तसेच माझ्या वैयक्तिक आयुष्यासाठी अविस्मरणीय असा आहे. माणसाने वेळेचे,प्रसंगाचे भान ठेवून आचरण केले पाहिजे असा संदेशच मंडलाधिकारी युवराज काटे यांनी आपल्या आचरणातून दिला आहे,असे मला वाटते.आपल्या दैनंदिन महसुली कामांच्या व्यापातून वेळ काढत काटे साहेबांनी मला दिलेल्या मानसिक आधाराची तुलना जगातील कोणत्याही गोष्टीशी होऊच शकत नाही.पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांच्यासोबत काम करताना बरेचसे चढ-उतार अनुभवले. उंब्रज मंडल कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या तक्रारी शांतपणे ऐकून घेत त्याच्यावरती योग्य तो उपाय करत न्याय देण्यापर्यंतची त्यांची तळमळ,धडपड खरोखर कौतुकास्पद होती. एक पत्रकार म्हणून ती मी स्वतः अनुभवलेली आहे. कोणत्याही अधिकाऱ्यासाठी एक हुद्दा हा फक्त मिरवण्यासाठी नसून सर्वसामान्यांना प्रामाणिकपणे न्याय देण्यासाठी असतो हे त्यांनी आपल्या कार्यशैलीतून सिद्ध केलेले आहे,असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. उंब्रज महसूल मंडलाचे मंडलाधिकारी म्हणून पाच वर्षांचा कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर कराड येथील तहसील कार्यालयात सहाय्यक महसूल अधिकारी म्हणून रुजू झाले आहेत. ईश्वर त्यांना यश,सुख-समृद्धी देवो. त्यांच्या सर्व इच्छा आकांक्षा पूर्ण होवो.. हीच ईश्वरचरणी प्रार्थना. अशा या संवेदनशील मनाच्या हजरजबाबी व्यक्तिमत्त्वास मानाचा मुजरा...!

# ठाणे ते अंबवडे खुर्द एसटी सेवेचा प्रारंभ, प्रवाशांनी केले समाधान व्यक्त

**दै.आवाज वृत्तसेवा...**

कराड – पाटण तालुक्यातील ढेबेवाडी परिसरातील प्रवाशांच्या मागणीवरून पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या विशेष प्रयत्नाने ठाणे ते अंबवडे खुर्द एसटी सेवेचा प्रारंभ नुकताच झाला.ग्रामस्थांनी जल्लोषात एसटीचे स्वागत करून चालक व वाहकाचा सत्कार केला.अंबवडे व ढेबेवाडी परिसरातील बहुसंख्य नागरिक नोकरी, व्यवसायानिमित्त ठाणे, मुंबई परिसरात वास्तव्यालाआहेत. ठाण्याहून थेट गावापर्यंत बससेवा सुरू व्हावी, अशी त्यांची मागणी होती. शिवसेना शाखाप्रमुख प्रदीप पाटील, ग्रामपंचायत सदस्य शरद पाटील यांच्या विशेष प्रयत्नाने पालकमंत्री देसाई यांच्या सूचनेनुसार ठाणे आगारातून ही नवीन बस सुरू केली. सकाळी नऊ वाजता ठाणे व आंबवडे खुर्द येथून एकाच वेळी ही बस रवाना होईल. कळवा, विटावा, ऐरोली, रवाळे, घणसोली, कोपरखैरणे, तुर्भे, जुहीनगर,



नेरूळ,बेलापूर, खारघर, कळंबोली, पनवेल, फुडमॉल, वाकड,चांदणी चौक, नवले ब्रिज, शिरवळ, पाचवड फाटा, सातारा, उंब्रज, कऱ्हाड, ढेबेवाडी, अंबवडे खुर्द असे बसचे थांबे आहेत. मुंबईतील चाकरमान्यांना गावाकडून ये – जा करण्यासाठी या बसचा फायदा होणार असल्याचे प्रदीप पाटील, वाहतूक नियंत्रक सचिन सूर्यवंशी यांनी सांगितले. दरम्यान, पहिल्या फेरीसाठी गावात बस दाखल होताच ग्रामस्थांनी जल्लोषात स्वागत केले. चालक व वाहकांचा सत्कार केला.

# सटाणा नगरपरिषदेच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांना अभिवादन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

तुषार रौंदळ, सटाणा:भारतीय इतिहासातील तेजस्वी आणि स्त्रीशक्तीच्या ताकदीची समाजाला जाणीव करून देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या औचित्याने अहिल्यादेवी चौकातील अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकाचे पूजन नगराध्यक्ष हर्षदा राहुलबाबा पाटील, यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच नगर परिषदेच्या वाचनालयात अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे उपनगराध्यक्ष सुमित वाघ यांच्या हस्ते पुजन व पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी बोलतांना नगराध्यक्षा म्हणाल्या अहिल्याबाई होळकर यांना त्यांच्या वडीलांनी बालपणीच वेद, शास्त्र, प्रशासन, न्याय आणि धर्मशास्त्र यांचे ज्ञान दिल्यामुळे त्यांनी पती निधना नंतर यशस्वी पणे राज्य कारभार करून हिंदू धर्माची पताका भारतभर पसरवली. त्यांच्या कार्य काळात काशीच्या शिव मंदिरात पिंड स्थापन करून मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला.



तसेच मध्य प्रदेशातील महेश्वर येथील घाटाची निर्मीती आणी वाराणशी, गंगोत्री, सोमनाथ, रामेश्वर, प्रयाग, अयोध्या येथे मंदिरांची निर्मीती व धर्मशाळा बांधण्यात आल्या. तसेच जिल्हयातील चांदवड येथिल रंग महालाची निर्मीती म्हणजे त्या काळातील इंजीनीरिंगचा उत्कृष्ट नमुना होय. त्यांच्या कार्य काळात व्यापार आणि कृषी उत्पादनाला मोठी चालना मिळाली आहे.आज त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन निस्वार्थी अहिल्या तयार झाल्यास भारत विश्व गुरु झाल्याशिवाय रहाणार नाही असेही त्या म्हणाल्या. यावेळी शिवसेना गटनेता राहुलबाबा पाटील,देव मामलेदार गटनेता मनिषा पवार, पाणीपुरवठा समिती सभापती भूषण सोनवणे, नगरसेवक जयश्री गरुड, विलास दंडगव्हाळ, रऊफ मुल्ला, सामाजिक कार्यकर्ते बाबूलाल मोरे, साहेबराव गरुड, संदीप खैरनार, बापू नंदाळे,नारायण नंदाळे, आबा नंदाळे,आदींसह विद्युत अभियंता मोहन पवार, स्वच्छता निरीक्षक मनोहर बोरसे, ग्रंथपाल ज्ञानेश्वर खैरनार, सचिन जाधव, विनायक पाकळे,विवेक सोनवणे, अमोल सोनवणे,कृष्णा कासार, प्रमोद गहिवड तसेच वाचनालयाचे वाचक उपस्थित होते.

# बाभूळगाव येथील मागासवर्गीय मुलांच्या शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज करावेत

**दै.आवाज वृत्तसेवा...**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, बाभुळगांव, ता.येवला, जि.नाशिक या शासकीय वसतिगृहात सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात अनु.जाती-१८, अनु.जमाती-१, विजाभज-२, इतर मागासवर्गीय-२, विशेष मागासवर्गीय-१ इ.प्रर्वगातील विदयार्थ्यांच्या जागा रिक्त असुन यामध्ये सर्व प्रवर्गामध्ये दिव्यांग व अनाथ प्रवर्गातील विदयार्थ्यांसाठी समांतर आरक्षण धोरणानुसार अनुक्रमे ५ टक्के व १ टक्के रिक्त असणा-या जागांसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दि.२५ जुन २०२६ पासून सुरू झालेली आहे. तरी ग्रामीण भागातील होतकरू व गुणवत्ताधारक इच्छुक विदयार्थ्यांनी https://hmas.mahait.org/ या वेब पोर्टलव्दारे शालेय विभागातील विदयार्थ्यांनी दि. ३०/०६/२०२६ तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविदयालयातील विदयार्थ्यांनी दि.१५/०७/२०२६ पर्यंत प्रवेश अर्ज ऑनलाईन भरून ऑनलाईन अर्जाची परिपुर्ण प्रिंट व त्यासोबतची लागणारी स्वसांक्षांकित केलेली कागदपत्रे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, बाभुळगांव, ता.येवला, जि.नाशिक येथे जमा करावयाचे आहेत. तरी माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी, पदविका, तांत्रिक अभ्यासक्रम, सर्व प्रकारच्या बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षामध्ये प्रवेश घेतलेल्या अनु.जाती/अनु.जमाती/ इतर मागासवर्गीय/विशेष मागासवर्गीय/ विजाभज/अपंग/अनाथ विदयार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन वसतिगृहाचे अधिक्षक श्री.लोखंडे सर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. वसतिगृह प्रवेशासाठी अर्जासोबत डोमेसाईल दाखला, गुणपत्रक, सन २०२५-२६ चा पालकांचा उत्पन्नाचा दाखला (तहसिल कार्यालयाकडील), जातीचे प्रमाणपत्र, आधारकार्ड प्रत, रहिवासी दाखला, बँक पासबुकची पहिल्या पानाची प्रत, शाळा सोडल्याचा दाखला, बोनाफाईड/शैक्षणिक शुल्क भरणा पावती, दिव्यांग प्रमाणपत्र (असल्यास), अनाथ प्रमाणपत्र (असल्यास), गॅप सर्टिफिकेट (गॅप असल्यास) व रेशनकार्ड प्रत इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहेत. वसतिगृह पात्र विदयार्थ्यांना सर्व सोयी-सुविधा, निवास, नाश्ता, दोन्ही वेळचे जेवण हे विनामुल्य आहे. या व्यतिरीक्त निर्वाह भत्ता प्रतिमाह रूपये १००० हा विदयार्थ्यांना दिला जातो, असेही प्रसिद्धीपत्रकात नमूद केलेले आहे.

# पिंपळगाव लेपला अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन



**दै. आवाज वृत्तसेवा...**
दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोरील प्रांगणात रविवार दि.३१ मे रोजी सकाळी ८. वाजता पुण्यश्लोक अहिल्याबाई देवी होळकर यांची जयंती साजरी उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी समाजिक कार्यकर्ते प्रविण काळे यांनी ग्रामस्थांना उपस्थित करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत पुजन करून अभिवादन केले.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्राच्या अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या गावात झाला. वयाच्या ८व्या वर्षी मल्हारराव होळकर यांच्या मुलासोबत विवाहबद्ध झाल्यानंतर त्यांच्या आयुष्यात आलेल्या विविध टप्प्यांनी त्यांच्या जीवनाला वळण दिले.

असे देखील त्यांचे महत्त्व सांगितले जाते.याच अनुषंगाने पिंपळगाव लेप येथील ग्रामपंचायत कार्यालयात अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी रघुनाथ काळे, गणपत काळे,प्रवीण काळे, अण्णासाहेब काळे, केदु काळे, दादा दौंडे, ज्ञानेश्वर रसाळ, दिगंबर दौंडे,मिलिंद सबनीस, बाळासाहेब अहिरे, रमेश गागरे, विनोद अहिरे, नवनाथ लांडबिले, साहेबराव दौंडे, मोहन बैरागी, जगदीश दौंडे,सोमनाथ पोटे, सुखदेव रसाळ, धर्मेंद्र दुनबळे दादा कुऱ्हाडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# पिंपळगाव लेप-शिरसगाव मार्गे जाणारी एसटी बस रस्त्याअभावी बंद; रस्ता होण्यासाठी ग्रामस्थांचा आमरण उपोषणाचा इशारा

**दै. आवाज वृत्तसेवा...**
दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी - येथून नागरिक मोठ्या प्रमाणात शासकीय कामकाजासाठी तसेच शालेय विद्यार्थी शिक्षणासाठी येवला-लासलगावला जातात.मात्र चार-पाच वर्षांपासून बस गाडीच बंद झाल्याने शाळकरी मुलांना महाविद्यालयात जाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे.या अगोदर ही बस गाडी २००५ सालापासून सुरळीत सुरू होती तेव्हापासून एसटी बसने प्रवास करत होते.परंतु यावर्षी देखील जून महिन्यात शाळा सुरू झाल्यानंतर शाळेत जाण्यासाठी बस नसल्याने मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे.यापूर्वी सुरू असलेली बस गाडी बंद झाल्याने हा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक वेळा विद्यार्थींनी व पालकांनी बस आगार प्रमुखांना सांगून देखील पिंपळगाव लेप मार्गे जाणारी बस बंद आहे.बस आगारातून देखील सांगण्यात येते की,त्या मार्गे जाणारा रस्ता खराब असल्यामुळे अनेक वेळा एसटी बसचे पाठे तुटून अनेकदा या रस्त्यामध्येच गाडी बंद पडली होती असे ही सांगितले जाते.

येवला-लासलगाव पिंपळगाव लेप मार्गे जाणाऱ्या एसटी बसचे दिवसातून चार वेळेस फेऱ्या असायच्या सकाळी साडेसात वाजता येवल्याकडून गाडी बाभुळगाव,भाटगाव,धुळगाव, सातारे, पिंपळगाव लेप, शिरसगाव, शेळकेवाडी, पाचोरे, निमगाव (वाकडा) यामार्गे एसटी बस लासलगावला पोहचत होती. याच मार्गे बस गाडी पुन्हा येवला आगारात पोहोचायची.मात्र या मार्गाचा सातारे, पिंपळगाव लेप, शिरसगाव हा ७ किलोमीटर अंतरावरील रस्ता खड्ड्यात गेल्याने या रस्त्याची मोठ्या प्रमाणात चाळण होऊन दयनीय अवस्था झाली आहे.अनेकदा सोशल मीडिया तसेच प्रिंट मीडियाला बातम्या प्रसिद्ध करून देखील संबंधित विभागाचा डोळेझाक पणा या शिरसगाव-पिंपळगाव लेप रस्त्याकडेच होत आहे. असे प्रश्न ग्रामस्थांना पडू लागले आहे.या रस्त्यावरून लासलगाव कांदा मार्केटला जाण्यासाठी अनेक गावातील शेतकरी वाहतूक करतात.मात्र या रस्त्याची संपूर्णपणे चाळण झाल्यामुळे शेतकऱ्यांना दुसरा पर्याय नसल्याने शेती उद्योग,व्यवसाय, शाळा,नोकरी,रुग्णालय महाविद्यालयीन शिक्षणासाठी येवला शहराकडे तसेच लासलगावकडे जावे लागते. अशा या खड्डेमय झालेल्या रस्तावरुन जीव मुठीत घेत जीवघेणा प्रवास करावा लागत असून रात्रीच्या वेळी खड्ड्याचा अंदाज येत नसल्याने सातत्याने अपघात होत आहेत.या रस्त्या संदर्भात मोठमोठे अपघात होत असल्यामुळे लवकरच रस्त्याचे काम सुरू होण्यासाठी तसेच या मार्गाने धावणारी एसटी बसगाडी लवकरात लवकर सुरू करण्यात यावी.अन्यथा रस्त्यावरच अमर उपोषण करण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपजिल्हाध्यक्ष मच्छिंद्रभाऊ जाधव, सामाजिक कार्यकर्ते देविदास इंगळे(सर) दत्तू वाकचौरे, गोरख बुल्हे, माधव वाकचौरे, माणिकराव वाघ, राजेंद्र वाघ, भाऊसाहेब काळे,विजय इंगळे, भाऊसाहेब धुमाळ, नितीन बुल्हे, गोकुळ जाधव, माणिक रसाळ, दिंगबर दौंडे,नानासाहेब काळे, प्रशांत रसाळ,ऋषी लोणारी, नितीन बुल्हे,आकाश चोरघे, विठ्ठल गागरे, स्वप्निल इंगळे, दयानंद बुल्हे, पंडित बुल्हे, विकास खांगळ,अभिराज दौंडे आदींनी दिला आहे.



दररोज सकाळी व सायंकाळी नित्यीनेमाने जाणारी एसटी बस सध्या बंद असल्याने शाळकरी विद्यार्थ्यांना तसेच ज्येष्ठ नागरिकांना बस गाडीत बसण्यासाठी ४ किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे.बसअभावी अनेक मुलींचे शिक्षण बंद होण्याची वेळ आली आहे.वारंवार लेखी निवेदने देऊन तोंडी महिती देऊन देखील कोणतीही दखल घेतली जात नाही. लवकरात लवकर या रस्त्याचे काम पूर्ण करून बससेवा सुरळीत सुरू करण्यात यावी.अन्यथा विद्यार्थ्यांसह रस्त्यावरच आंदोलन छेडले जाईल. श्री. मच्छिंद्र जाधव.... स्वाभिमानी शेतकरी संघटना.

# डुबेरला जैविक दशपर्णी अर्क प्रात्यक्षिक संपन्न

**दै.आवाज वृत्तसेवा...**
पाणी फाउंडेशन सत्यमेव जयते अंतर्गत डुबेरला सिन्नर तालुका कृषी अधिकारी श्री ज्ञानेश्वर नाठे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जय शिवराय शेतकरी गट डुबेरे यांच्यातर्फे शेतकऱ्यांसाठी जैविक दशपर्णी अर्क प्रात्यक्षिक घेण्यात आले याकरिता कृषी विभागाचे दीपक गायकवाड साहेब यांनी मार्गदर्शन करून ते कसे तयार करायचे तसेच ते वापरल्यानंतर पिकांना कसे वापरावयाच्या या संदर्भात संपूर्ण शेतकरी गटाला माहिती दिली आज शेती करण्यासाठी रासायनिक कीटकनाशके व खतांचा वापर होत आहे पण हे शरीरा करता हानिकारक असून आज जास्तीत जास्त लोकांनी सेंद्रिय शेतीकडे आकर्षित होणे गरजेचे आहे म्हणून सेंद्रिय शेती करण्यासाठी पिकांच्या वाढीसाठी तसेच कीड व तसेच विविध रोगांच्या साठी या दशपर्णी अर्कचा उपयोग फवारणी म्हणून केला जाणार आहे याचा पिकांवर योग्य तो परिणाम होऊन पीक व्यवस्थित वाढून उत्पादनामध्ये वाढ होते या प्रात्यक्षिक करिता कृषी विभागाचे दिपक गायकवाड तसेच कृषी पिक विमा अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते सुयोग वाजे तसेच गट प्रतिनिधी पंकज जाधव कारभारी वारुंगसे रावसाहेब वाजे अमृता जाधव विठ्ठल जाधव संतोष वाजे दत्तात्रय राहटळ इत्यादी शेतकरी या प्रात्यक्षिक मध्ये सामील झाले होते.



# नाशिक जिल्ह्याला ५.६० कोटींवर अनुदान मंजूर

**दै.आवाज वृत्तसेवा...**
यशवंतराव ताडगे पळाशी प्रतिनिधी :-समग्र शिक्षा अभियान आणि शिक्षण हक्क कायदा २००९ अंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी पहिली ते आठवीच्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व पाठ्यपुस्तके देण्याची तयारी पूर्ण झाली आहे. या योजनेनुसार शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना दोन गणवेश, एक जोडी बूट आणि दोन जोडी सॉक्स शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून पुरवले जाणार आहेत. त्यासाठी नाशिक जिल्ह्यासाठी ५.६० कोटींचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. या योजनेसाठी दोन गणवेशांकरिता प्रति विद्यार्थी ६०० रुपये अनुदान मंजूर आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात ८० टक्के रकमेनुसार (एका गणवेशाचे २४० रुपये याप्रमाणे) नाशिक जिल्ह्यातील १५ तालुक्यांमधील २,३३,५०३ पात्र विद्यार्थ्यांसाठी एकूण ५,६०,४०,७२० रुपये इतका निधी गटस्तरावर वितरित केला आहे. तालुकाविहाय लाभार्थी संख्या व कंसात मंजूर अनुदान मालेगाव : २६,५५३ लाभार्थी (६३,७२,७२०), दिंडोरी : २१,९४६ लाभार्थी (५२,६७,०४०), निफाड : २०,७३६ लाभार्थी (४९,७६,६४०), इगतपुरी: १९,४१५ लाभार्थी (४६,५९,६००), नांदगाव : १६,९४५ लाभार्थी ( ४०,६६,८००), बागलाण : १६,८४९ लाभार्थी (४०,४३,७६०), सिन्नर : १५,५९४ लाभार्थी ( ३७,४२,५६०), येवला : १४,३६३ लाभार्थी (३४,४७,१२०), सुरगाणा : १४, २४५ लाभार्थी ( ३४,१८,८००), त्र्यंबकेश्वर : १३,८०० लाभार्थी (३३,१२,०००), कळवण : १२,०६३ लाभार्थी (२८,९५,१२०), चांदवड ११, ९५९ लाभार्थी (२८,७०, १६०), नाशिक : ११,६३४ लाभार्थी ( २७,९२,१६०), पेठ : १०,७९५ लाभार्थी (२५,४०,८००), देवळा : ६,६०६ लाभार्थी (१५,८५,४४०).

# सोमनाथ मगर यांची कांदा उत्पादक संघटनेचच्या तालुकाध्यक्षपदी निवड



**दै.आवाज वृत्तसेवा...**
**नांदगाव** – महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना संस्थापक अध्यक्ष मा. भारत दिघोळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नाशिक जिल्हाध्यक्ष तथा राज्य कोअर कमिटी सदस्य मा. जयदीप भदाणे यांच्या नेतृत्वात श्री. सोमनाथ रघुनाथ मगर सप्तनगर, रा. न्यायडोंगरी, ता. नांदगाव, जि. नाशिक यांची महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या नांदगाव तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात येत आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे, संघटना विस्ताराला गती देणे तसेच शेतकरी हितासाठी कार्य करणे ही महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.







दररोज वाचा, दैनिक आवाज